# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.२९६/२०२४

**विषय :-** विद्यापीठ आस्थापनेतील उर्वरित अधिकारी/कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करणेकरिताचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** १.महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.संकिर्ण-२४०८/प्र.क्र.४१/विशि-१, दि.०५/०९/२०२४.
२.उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/७ वा वेतन आयोग/अधी.३/विशि-१/भाग-७/४४४३, दि.११/०९/२०२४.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, शासन निर्णय क्रमांकः-शिस्तभंग-२०१५/प्र.क्र.६६४/१५/विशि-१, दि.१७ डिसेंबर, २०१८ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदनामात बदल करुन वेतनश्रेणीत बदल करण्यात आलेल्या पदांच्या वेतनश्रेण्या व पदनामे पूर्ववत करुन अतिप्रदान झालेल्या रकमेची वसूली करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केलेले होते. सदर शासन निर्णयाद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदनाम व वेतनश्रेणी बदलासंदर्भातील महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेले काही शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केलेले आहेत. त्यासंबंधित प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रविष्ट असून मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे अशा पदांना अद्याप सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही. अशा पदांना सातवा वेतन आयोग लागू करण्याच्या अनुषंगाने "दि.१७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये पूर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मान्य आहे, सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे, तसेच त्याआधारे सातवा वेतन आयोग लागू करावा", असे प्रमाणपत्र इच्छुक कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकरित्या विद्यापीठाने प्राप्त करुन घ्यावे आणि सदर इच्छुक अधिकारी/कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतची अशा आशयाची प्रमाणपत्रे आणि अनुषंगिक माहितीचा प्रस्ताव मा.संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयास त्वरित सादर करावा, असे उपरोक्त संदर्भीय दि.०५ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर पत्राच्या अनुषंगाने मा.उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ही उपरोक्त संदर्भीय क्र.०२ अन्वये कळविलेले आहे. (सोबत सदर शासन व संचालनालयाच्या पत्रांची प्रत जोडली आहे.)

याबाबत विद्यापीठ आस्थापनेतील सर्व संबंधित शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ आस्थापनेतील संबंधित शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याच्या अनुषंगाने संबंधित इच्छुक शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र दोन प्रतींमध्ये भरुन, सदर परिपत्रक प्रसिध्द झाल्यापासून पुढील आठ दिवसांच्या आत प्रशासन शिक्षकेतर कक्षास सादर करावे.

**सोबत :-** १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.संकिर्ण-२४०८/प्र.क्र.४१/विशि-१, दि.०५/०९/२०२४.
२. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/७ वा वेतन आयोग/अधी.३/विशि-१/भाग-७/४४४३, दि.११/०९/२०२४.
३. प्रमाणपत्र नमुना.

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 5209 )
दिनांक : 10 DEC 2024 )

(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)
प्रभारी कुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

(मशा, उवतंशि विभाग यांचे पत्र क्र.संकिर्ण-२४०८/प्र.क्र.४१/विशि-१, दि.०५/०९/२०२४ व उशिसं, मरा, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/७ वा वेतन आयोग/अधी.३/विशि-१/भाग-७/४४४३, दि.११/०९/२०२४ ला अनुसरुन)

# प्रमाणपत्र
## CERTIFICATE

मी खाली सही करणार, खालीलप्रमाणे हमी देतो/देते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.पीयुपी २०१०/(५९३/१०)/विशि-१ दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१०, क्र.पीयुपी २०११/(६३/११)/ विशि-१, दिनांक १८ फेब्रुवारी, २०११ आणि क्र.पीयुपी २०१२/(३९४/१२)/विशि-१, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१२ नुसार विद्यापीठातील काही पदांची पदनामे, पदसंख्या, ५ व्या वेतन आयोगानुसारच्या व ६ व्या वेतन आयोगानुसारच्या वेतनश्रेण्या सुधारित करण्यासंबंधीचे शासन निर्णय निर्गमित केले होते. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्रमांकः-शिस्तभंग-२०१५/प्र.क्र.६६४/१५/विशि-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संबंधित पदनामातील बदल व त्या अनुषंगाने सुधारित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्या पूर्ववत करण्याबाबतचे सदरचे तीन शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केलेले आहेत. त्यासंबंधित प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रविष्ट असून मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे मला अद्यापपर्यंत सातवा वेतन आयोग लागू झालेला नाही.

सबब, सदर प्रकरण सद्यःस्थितीत न्यायप्रविष्ट असून या प्रकरणामध्ये पदनामात बदल करुन वेतनश्रेण्या सुधारित करण्याबाबतचे शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यासंबंधीचा शासनाचा निर्णय क्रमांकः-शिस्तभंग-२०१५/प्र.क्र.६६४/१५/विशि-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ निर्गमित झालेला आहे. सदर दिनांक १७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये पूर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मला मान्य आहे, सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास माझी अनुमती आहे, तसेच त्याआधारे मला सातवा वेतन आयोग लागू करावा.

दिनांक/Date : सही/Signature :

ठिकाण/Place : नाव/Name :

पदनाम/Desingnation :

सेवक क्र./Emp.No. :

PR / NT

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
मंत्रालयीन टपाल
जावक दिनांक :
5743
05.09.2024
06.09.2024
NT

09 SEP 2024
8069

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४
ई-मेल. vishi१-hted@mah.gov.in,

दिनांक:- ५ सप्टेंबर,२०२४

क्रमांक:-संकिर्ण-२४०८/प्र.क्र.४१/विशि-१

प्रति,
१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
२) कुल सचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ-पुणे.
३) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर.
४) कुल सचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
५) कुल सचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
६) कुल सचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
७) कुल सचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथील उर्वरीत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याची विनंती.

विषयांकित प्रकरणी मा.श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू बा.कडू, विधानसभा सदस्य यांच्याकडून दिनांक २५ जून,२०२४ चे पत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सहा विद्यापीठातील पदनामे आणि वेतनश्रेणी, विहित कार्यपध्दतीची अवलंब न करता दिनांक २२ नोव्हेंबर,२०११ च्या शासन निर्णयान्वये बदलण्यात आली होत्या. यास्तव, सदर आदेश दिनांक १७ डिसेंबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले असून पदनामे आणि वेतनश्रेणी पूर्ववत करण्यात आली आहेत. त्यासंबंधित प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रविष्ट असून मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे अश्या पदांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही. तथापि, मा.विधानसभा सदस्य आणि संबंधित कर्मचारी यांची विनंती विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

(१) "दिनांक १७ डिसेंबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये पूर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मान्य आहे, सदर शासन निर्णयामधील तरतुदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे, तसेच त्याआधारे ७ वा वेतन आयोग लागू करावा," असे प्रमाणपत्र, विद्यापीठाच्या कुलसचिवांनी इच्छुक कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिरित्या प्राप्त करुन घ्यावे.

(२) विद्यापीठाच्या कुलसचिवांनी कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे आणि माहिती संकलित करून संचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावी.

(३) संचालक, उच्च शिक्षण यांनी अशा पदांची, पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी आधारभूत मानून समकक्ष सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी नमूद करावी, त्यानुसार ७ व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी प्रस्तावित करावी.

(४) संचालक, उच्च शिक्षण यांनी संकलित माहिती आणि ७ वा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(सं. रा. उतेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- १) मा.श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू बा.कडू, विधानसभा सदस्य, ६६ सी, मनोरा आमदार निवास, नरीमन पॉईंट, मुंबई यांना माहितीस्तव.

२)निवडनस्ती.

प्रशासन शिक्षकेतर कक्ष
12 SEP 2024
आवक क्र. 8204
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 5875
दिनांक : 12.09.2024
आवक दिनांक : 12.09.2024
विभाग : NT

महाराष्ट्र शासन
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**412 ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे 411 016**

Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२१११

क्रमांक-युएनआय/७ वा वेतन आयोग/अधी.३/विशि-१/ भाग-७ 4443 दि. 12 SEP 2024

प्रति,

१.कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
३.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४.कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
५.कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
६.कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामधील उर्वरित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोग लागू करण्याची विनंती.**

संदर्भ शासनपत्र क्रमांक संकोर्ण२४०८/प्र.क्र.४१/विशि-१ दि.५ सप्टेंबर, २०२४

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे या संचालनालयास व आपणास पाठविलेले संदर्भिय पत्र सोबत जोडले आहे, कृपया अवलोकनी घ्यावे.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठातील पदनामे व वेतनश्रेण्या या वेगवेगळया शासन निर्णयानुसार बदलण्यात आल्या होत्या. सदर सर्व शासन निर्णय हे दि.१७ डिसेंबर, २०१८च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले असून पदनाम आणि वेतनश्रेण्या पुर्ववत करण्यात आलेल्या आहेत. त्यासंबंधित प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असून मा.न्यायालयाने दि.१७.०३.२०२३ च्या आदेशान्वये स्थगिती आदेश दिले आहेत. तसेच अशा पदांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही.

तथापि, मा.विधानसभा सदस्य आणि संबंधित कर्मचारी यांनी केलेली विनंती विचारात घेता, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे शासनाने नमूद केलेले आहे.

AR
Sup. आरती प्रभाळे
13/9

DR. Admin (NT)

दि.१७ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयात नमूद करणेत आलेनुसार पुर्ववत करण्यात आलेली पदनामे आणि वेतनश्रेणी मान्य आहे. सदर शासन निर्णयामधील तरतूदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे, तसेच त्याआधारे ७ वा वेतन आयोग लागू करावा असे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या कुलसचिवांनी इच्छूक कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकरित्या प्राप्त करून घ्यावे.

त्या अनुषंगाने सदरची प्रमाणपत्रे आणि माहिती संकलित करून विद्यापीठांनी एकत्रित माहिती या संचालनालनालयास सादर करावी.

वर नमूद पदांची माहिती सादर करताना खालील तक्त्यात माहिती नमूद करावी.

**विद्यापीठाचे नाव-**

| अ.क्र. | मूळ आकृतीबंधाचा शासन निर्णय दि.---- मधील पदनाम | | रद्द केलेल्या शासन निर्णय दि.---- मधील पदनाम | | मूळ शासन निर्णयानुसार मंजूर असलेली पदसंख्या | पदनामे आणि वेतनश्रेणी पूर्ववत करून मान्य आहे, तसेच सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार झालेल्या अतिप्रदानाची परतफेड करण्यास अनुमती आहे व त्या आधारे ७ वा वेतन आयोग लागू करावा असे प्रमाणित केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | त्या पदास पाचव्या वेतन आयोगाची असलेली वेतनश्रेणी | अ.क्र. ८ मधील वेतनश्रेणीशी समकक्ष सातवा वेतन आयोगातील वेतनस्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | अ.क्र. | पदनाम | अ.क्र. | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

**(डॉ.प्रकाश बच्छाव)**
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर